ऑगस्ट- २०२३ * अंक- २ रा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2023-24





आर.आय.प्रेसिडेंट
रो. गॉर्डन आर. मॅकइनली



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
रो. आशा वेणुगोपाल



प्रेसिडेंट
रो. मनोज जोशी



ऑन.सेक्रेटरी
रो. अॅड. हेमंत भंगाळे



बुले.कमिटी चेअरमन
रो. स्वाती ढाके

CREATE HOPE in the WORLD

### संपादकीय....

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वांना आपल्या देशाच्या ७६ व्या स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

जरी देशाला स्वातंत्र्य मिळून ७६ वर्ष झाले तरी आजही आपण आपल्या स्वातंत्र्य सैनिकांना विसरलो नाही. ज्यांनी स्वतंत्र लढ्यात आपल्या प्राणांचे बलिदान दिले. ध्वजवंदन, देशभक्तीपर गीत गायन करून आपण त्यांना मानवंदना देतो. या खऱ्या हिरोमुळेच आज आपण हे प्रगत समृद्ध आयुष्य जगत आहोत. १९० वर्षाच्या गुलामगिरीतून मुक्त झालो आहोत. आपण मंगळापर्यंत तर पोहोचलोच, पण मागील आठवड्यात आपल्या शास्त्रज्ञांनी चंद्रयान ३ जे यशस्वी उड्डाण केले, याचा सर्व भारतीयांना अभिमान आहे.

ऑगस्ट महिना हा 'मेंबरशिप अँड एक्सटेंशन' डेसिग्नेटेड मंथ आहे. आपल्या क्लब मधील वयस्कर मंडळी क्लब सोडून गेले, तरी नवीन तरुण पिढीची संख्या क्लब मध्ये वाढली आहे .वयोमानाने ज्या सदस्यांनी आपला क्लब सोडला तरी आपण त्यांना कधीच विसरणार नाही .त्यांचे आशीर्वाद सतत आपल्या कार्याला राहतीलच. शेवटी परिवर्तन हाच प्रकृतीचा नियम आहे. तरुण मंडळींना संधी व योग्य मार्गदर्शन करून आपण आपल्या क्लबची ताकद वाढवू शकतो.

रोटरी इंटरनॅशनल ही जगातील सर्वात मोठी सेवा संस्था आहे. 'इतरांना सेवा प्रदान करणे, सचोटीला प्रोत्साहन देणे आणि व्यवसाय, व्यावसायिक आणि समुदाय नेत्यांच्या सहवासाद्वारे जागतिक समज, सद्भावना आणि शांतता वाढवणे' हे त्याचे नमूद केलेले ध्येय आहे. ही एक गैर-राजकीय आणि गैर-धार्मिक संस्था आहे. सदस्यत्व हे अर्ज किंवा आमंत्रणाद्वारे आणि विविध सामाजिक घटकांवर आधारित असते. जगभरात ४६,००० क्लब आहेत, ज्यात १.४ दशलक्ष व्यक्ती आहेत, ज्यांना रोटरी सदस्य म्हणून ओळखले जाते.

आपल्या क्लब मध्ये विविध क्षेत्रात कार्य करणारी मंडळी आहेत. त्यामुळे समाज एकीकरण, गतिशील व प्रगत होण्यास मदत होते. आपण एकमेकांचे सुखदुःख एका परिवारासारखे जपतो. सर्व समाजामध्ये शांतीपूर्ण सामाजिक संबंध साध्य करण्यासाठी व ते टिकून ठेवण्यासाठी रोटरी क्लब हा एक सुंदर प्लॅट फॉर्म आहे. रोटरी क्लबचे आतापर्यंतचे कार्य आपण जनसामान्यांपर्यंत पोहोचवले तर नक्कीच आपल्याला नवीन सभासद मिळतील. आपल्या कामातील तळमळ, पारदर्शीपणा समाजात बदल घडवून आणेल.

**- रो. स्वाती ढाके**

### अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम!

नवीन रोटरी वर्ष चालू होऊन आता एक महिना झाला. यामागील महिन्यात आपण साप्ताहिक सभा घेतल्या यामध्ये पहिली साप्ताहिक सभा ही आपण नेहमीप्रमाणे पदग्रहण सोहळा म्हणून १० जुलैला साजरी केली. या पदग्रहण सोहळ्याला प्रमुख अतिथी भूतपूर्व प्रांतपाल रोटेरियन मोहनजी पालेशा हे उपस्थित होते त्यांनी ' ये जिंदगी ना मिले दोबारा' या शीर्षकांतर्गत खूप सुंदर मोटिवेशनल स्पीच दिले. त्याच दिवशी सकाळी आपण मेडिकल कमिटीच्या अंतर्गत मोतीबिंदू चे चार ऑपरेशन केले याकरिता आठ पेशंट ची निवड ही पद्मालय येथे डॉक्टर जहागीरदार व डॉक्टर हेमंत बाविस्कर यांच्या टीमने एक शिबिर घेऊन केली. या शिबिराचे उद्घाटन सुद्धा आपण सन्माननीय अतिथी रोटेरियन मोहनजी पालेशा यांच्याकडून केले. या कार्यक्रमाला आपल्याकडील सदस्य व डॉक्टर हेमंत बाविस्कर यांच्या स्टाफची खूप मदत झाली. तसेच १ जुलै रोजी सध्याच्या प्रांतपाल रोटेरियन आशा वेणूगोपाल यांचा पण पदग्रहण सोहळा नाशिक येथे पार पडला. आपल्याकडे सेवन बाय सेवन ची कमिटी आणि इंटरॅक्ट क्लब कमिटीचे काम जोरात चालू झाले आहे त्याबद्दल कमिटीचे चेअरमन सुबोध सराफ व इंटरनेट कमिटीचे चेअरमन डॉक्टर काजल फिरके यांचे अभिनंदन. ऑगस्ट महिना हा मेंबरशिप डेव्हलपमेंट मंथ म्हणून साजरा करणार आहोत. त्या अनुषंगाने आपण सर्व साप्ताहिक सभांचा आयोजन करणार आहोत. याच महिन्यात आपल्या रोटरीच्या प्रांतपाल रोटेरियन आशा वेणूगोपाल ओसीव्ही च्या निमित्ताने १८ ऑगस्ट शुक्रवार रोजी आपल्या क्लबला भेट देत आहेत. या दिवशी आपले दिवसभर भरगच्च कार्यक्रम असतील व संध्याकाळी नेहमीप्रमाणे क्लबची एक फॅमिली मीटिंग असेल ती आपल्याला एका सोहळ्याप्रमाणे साजरी करायची आहे त्याच मध्ये आपल्याला सन्माननीय प्रांत पालांकडून काही मार्गदर्शन पण मिळणार आहे म्हणून मी सगळ्यांना विनंती करतो की आपण सर्वांनी या मीटिंग करता आताच वेळ राखून ठेवावा. धन्यवाद.....!

**- रो. मनोज जोशी**

# जुलै महिन्यातील साप्ताहिक सभा




* १० जुलै – क्लबची पहिली साप्ताहिक सभा ही ७ जुलै ऐवजी १० जुलै ला घेण्यात आली. यावेळी पदग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला होता. याबद्दलचे सविस्तर माहिती पान नंबर ७ देण्यात आली आहे.

* १६ जुलै– रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही क्लब असेंब्ली म्हणून आयोजित करण्यात आली. रोटरी हॉल, गणपती नगर येथे सकाळी ९ ते १२.३० वा वेळात सभा संपन्न झाली. यावेळी सर्व कमिटी मेंबर्सने आपल्या कमिटी बाबत विचार व्यक्त केले. आपल्या क्लबचे असिस्टंट गव्हर्नर नितीन इंगळे यावेळी उपस्थित होते.







* २१ जुलै – रोजी या महिन्यातील तिसरी साप्ताहिक सभा ही बिझनेस मिटींग होती. यावेळी रोटरी वर्ष २०२२-२३ चे ऑडीट रिपोर्ट मंजूर करण्यात आले. तसेच रोटरी वर्ष २३-२४ चे बजेट पास करण्यात आले.

* २८ जुलै– रोजी आयोजित करण्यात आलेल्या साप्ताहिक सभेचा विषय होता 'महिलांसाठी आरोग्य दुत', वक्त्या होत्या निधी फाऊंडेशनच्या सौ.वैशाली विसपुते यांनी उपस्थितांना खूप छान प्रकारे मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा.क्षमा सराफ यांनी केली तर आभार प्रदर्शन सौ.हर्षदा भंगाळे यांनी केली.



# प्रोजेक्टस्




रोटरी क्लब जळगाव लिटरेसी कमिटी तर्फे शनिवारी ए टी झांबरे माध्यमिक विद्यालय येथील शिक्षकांसाठी नवीन शैक्षणिक धोरण: बदल, संधी आणि आव्हाने या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. वक्ते रो.पंकज व्यवहारे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष मनोज जोशी, सचिव ॲड.हेमंत भंगाळे, लिटरेसी कमिटी चेअरमन शुभदा कुलकर्णी, पी.पी.रो. पुनम मानुधने,रो.सुबोध सराफ व वृषाली व्यवहारे, प्रणिता झांबरे, मुख्याध्यापक ए टी झांबरे विद्यालय आणि सुजाता फालक मुख्याध्यापक उपस्थित

रो. डॉ.हेमंत बाविस्कर यांचे नेत्रायु हॉस्पिटल येथे गरीब व गरजू रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या, सदर प्रोजेक्ट ला रो.पीडीजी मोहन पालेशा यांनी उपस्थिती दिली. डॉ.जयंत जहागीरदार, डॉ. हेमंत बाविस्कर, सौ.वैशाली बाविस्कर, रो.योगेश गांधी, पीपी.रो.संदीप शर्मा, रो.अमोल पाटील, रो.किशोर तलरेजा, आयपीपी.रो.राजेश वेद, रो.ॲड.सागर चित्रे, रो.रितेश जैन, रो.मुकेश महाजन, मानद सचिव रो.ॲड. हेमंत भंगाळे आदी उपस्थित होते.




इंटरॅक्ट कमिटी तर्फे १४ शाळांमध्ये इंटरॅक क्लबचे पदग्रहण समारंभ आयोजित करण्यात आले त्यावेळी नॉन मेडिकल कमिटीतर्फे प्रत्येक शाळेतील इंटरॅक्ट क्लबच्या सदस्य विद्यार्थ्यांना आपल्या क्लब तर्फे वह्या वाटप करण्यात आल्या.






# रोटरी सदस्यत्व व वृद्धी महिना

पी.पी.रो. डॉ. तुषार फिरके



रोटरीच्या ठरलेल्या १२ महिन्यांपैकी ऑगस्ट महिना हा मेंबरशिप महिना म्हणून आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर २०० देशांमध्ये साधारणत: २ मिलियन एवढे रोटरी सभासद आहेत तर भारतात १,१५,००० एवढी रोटरी सदस्य संख्या आहे तर रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० मध्ये ५,३०० एवढी रोटरी सभासद संख्या आहे. प्रत्येक रोटरी इंटरनॅशनल अध्यक्षाचा सभासद वाढीवर भर असतो ते असं म्हणतात 'इच वन ब्रिंग वन' म्हणजेच दरवर्षी आपल्या एका मित्राला रोटरी सदस्य बनवा.

रोटरी सभासदत्त्वाचे २ प्रकार आहेत. :– ✻ ॲक्टीव्ह ✻ ऑनररी

रोटरी मेंबरशिप ३ स्टेजेस मध्ये विभागली जाते. :– ✻ डेव्हलपमेंट , ✻ रेटेन्शन, ✻ एक्सटेन्शन

### ✻ डेव्हलपमेंट ✻

जसा काळ बदलत जातो. तसे क्लासीफिकेशन सुद्धा काही वाढत जातात जसे आता नवीन मध्ये सॉफ्टवेअर आयटी सेक्टर आलेत. त्याचा अभ्यास करून आपल्या क्लब मध्ये ज्या क्लासीफिकेशन चे सभासद नाहीत ते वाढवावेत व त्या दृष्टीने सर्वसमावेशक घटकाचा समावेश करावा.

रोट्रॅक्टर्स ला रोटरी सभासद करा. तरूण पिढीला जास्त समाविष्ट करावेत.

नवीन मेंबर करण्याआधी त्यांना आपल्या क्लबच्या ३ मिटींग अ‍ॅटेन्ड करण्यास सांगाव्यात. रोटरीची माहिती त्यांना द्यावी. संचालक मंडळ व बाकी सर्व सभासदांची ना–हरकत असावी.

### ✻ रेटेन्शन ✻

७ स्टेपस् आहेत– १) आयडेन्टी द मेंबर्स, २) इन्ट्रडयुस, ३) इन्वाईट, ४) इन्डक्ट,
५) ओरीयंट ऑर इन्फॉम, ६) इन्व्हॉल्व हिम/हर इन प्रोजेक्टस्, ७) एज्युकेट

त्यांना डिस्ट्रीक्टच्या कॉन्फरन्स, ॲसेंम्बली, सेमीनार यात भाग घेण्यास उद्युक्त करावे. नवीन व जुन्या सभासदांचे सामिलीकरण चांगले पाहिजे.

### ✻ एक्सटेन्शन ✻

नवीन सभासद वाढविणे, नवीन रोटरी क्लबची स्थापना करणे– गटीकरणामुळे, नवीन क्लब नकोत. ज्यांना फिजीकली मिटींगला हजर राहता येत नाही. अशांसाठी सॉफ्टवेअर क्लबस् किंवा ई–क्लबस् सुरू करावेत. तेवढी सभासद संख्या जास्त तेवढी जास्त सेवा करण्याची संधी मिळते.

इच क्वॉलीफाईड न्यू मेंबर इन्क्रीस रोटरी कॅपॅसिटी फॉर सर्व्हीस ॲन्ड इन्शुअर द फ्युचर ऑफ ऑगनायझेशन.

# रोटरी : एका सुखद प्रवासाच्या आठवणी

रो. डॉ. शुभदा कुलकर्णी



रोटरी प्रणाम !

२०१० साली मी आपल्या रोटरी क्लबची सदस्य झाले. त्यापूर्वी माझे सासरे डॉ.बी.व्ही.कुलकर्णी याच क्लबचे सदस्य असल्यामुळे मी रोटरी परिवारात सामील होतेच. त्यामुळे क्लबच्या अनेक ज्येष्ठ सदस्यांशी चांगला परिचय होता. म्हणून आपल्या क्लब मध्ये सामावून जाणे मला सोपे गेले.

२०१२-१३ यावर्षी रो. शांतीकुमार दमाणी क्लबचे अध्यक्ष होते. त्यांच्या सोबत सचिव म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. त्यानिमित्ताने रोटेरिअन्स आणि त्यांचे कुटुंबीय यांच्याशी अधिक परिचय झाला. सर्व समित्यांचे कामकाज कसे चालते हे बघता आले. आपण यासाठी जेवढा वेळ देऊ तेवढे जास्त शिकायला मिळते. इतरांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा फायदा घेता येतो व आपले व्यक्तीमत्त्व परिपक्व होण्यासाठी असा जनसंपर्क आवश्यक असतो.

दरवर्षी विविध समित्यांची मी सदस्य असते. काही समित्यांची प्रमुख म्हणून मी काम केले आहे. एकत्र काम केल्याने विचारांची देवाण घेवाण होते. नव्या कल्पना पुढे येतात. त्यातून रोटरीच्या कामात सातत्य राहते. सर्वांचे सहकार्य मिळवण्यासाठी संवादाची गरज असते. ही आपुलकी रोटरी सदस्य आणि त्यांचे कुटुंबिय यांच्याकडून वेळोवेळी जाणवते. २०१९-२० यावर्षी माझे मिस्टर, कॅप्टन मोहन कुलकर्णी क्लबचे अध्यक्ष होते. आणि त्यावेळी फर्स्ट लेडी ऑफ क्लबचा मान मला मिळाला. त्यावेळी कोरोना काळात समाजासाठी सेवा करण्यासाठी आपले सदस्य खूपच सक्रीय होते, याची विशेष नोंद केली पाहिजे.


व्यवस्थापन शास्त्र शिकवत असल्यामुळे रोटरी या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या कार्याचा त्या अनुषंगाने मी विचार केला. रोटरी मधील सदस्यांची संख्या व सदस्यांचे समाधान यावर एक शोधनिबंध प्रसिद्ध झाला आहे. तसेच रोटरीतील महिलांचे स्थान यावरील शोधनिबंध एका पुस्तकात प्रसिद्ध झाला आहे. त्यामुळे या संस्थेच्या कार्यपद्धतीची अधिक चांगली ओळख मला व इतरांना झाली आहे.

मी पॉल हॅरिस फेलो आहे. याशिवाय मला बेस्ट झोन सेक्रेटरी ॲवॉर्ड २०१२-१३ सालातील कामगिरी साठी मिळाले आहे. शैक्षणिक क्षेत्रातील माझ्या कामाची दखल घेऊन रोटरी तर्फे नेशन बिल्डर ॲवॉर्ड, आऊट स्टॅडींग टिचर ॲवॉर्ड रोटरी एक्सलन्स् ॲवॉर्ड मला प्रदान करण्यात आली. याचा आनंद आहेच पण यातून येणाऱ्या जबाबदारीची जाणीवही आहे.

संचालक मंडळाची सदस्य म्हणून काम करतांना आपल्या क्लबची निर्णय प्रक्रिया कशी असते हे समजले. तसेच उपक्रम राबविण्याची कार्यशैली जाणून घेता आली. योग्य अंमलबजावणीसाठी नियमांची आवश्यकता असते. तसेच वेळोवेळी आढावा घेतला पाहिजे हे यातून शिकले. ७x७x७ च्या निमित्ताने विविध शाळांमधील मुलांशी संवाद साधता आला, विचार मांडता आले. रोटरॅक्टच्या युवा मंडळींची ऊर्जा उत्साह वाढविणारी होती. लेडीज कमिटीच्या माध्यमातून रोटरी ॲन्सशी मैत्री जुळाली. प्रत्येक कमिटीच्या कामातून अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली. रोटरी सोबतचा हा सुंदर प्रवास अजून काही काळ तरी अनुभवायला मिळावा. एवढीच अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करते. आपल्या रोटरी परिवाराने जे दिले, त्याबद्दल ऋण व्यक्त करते. धन्यवाद !.

# जागृती अवयवदानाविषयी

डॉ.शशिकांत गाजरे



मधुमेह, उच्च रक्तदाब जंतुसंसर्ग, जळीत रूग्ण, फुफ्फुसांचे विकार, किडनी विकार अशा वेगवेगळ्या कारणांमुळे बऱ्याच वेळा शरीरातील अवयव किडनी, यकृत, फुफ्फुस, स्वादुपिंड ग्रंथी, हृदयविकार यांच्यात खराबी होवून पूर्णपणे निकामी होतात. अशा रूग्णांमध्ये अवयव किंवा उत्ती (पेशी) बदलाशिवाय पर्याय नसतो.एखाद्या जिवंत अथवा मृत व्यक्तीच्या शरीरातील अवयव दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या शरीरात रोपण करून त्या व्यक्तीचे आयुरारोग्य सुधारण्याच्या उपचार पद्धतीला अवयव प्रत्यारोपण म्हणतात.

अवयव प्रत्यारोपणा करीता अवयव दान अतिशय महत्त्वाचे असते. एखाद्या व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याचे वेगवेगळे अवयव इतर गरजू रूग्णांकरीता वापरण्याची इच्छा दर्शविणे म्हणजेच अवयवदान.

भारतात दरवर्षी पाच लाख रूग्ण अवयव न मिळाल्याने मृत्युमुखी पडतात. त्या मधील दोन लाख रूग्ण यकृताच्या आजाराने तर पन्नास हजार पर्यंत हृदयाच्या विकाराने मरण पावतात. दरवर्षी दीड लक्ष मूत्रपिंड्याच्या रूग्णांना मूत्रपिंड दानाची गरज असते. पण पाच हजार रूग्णांनाच ते मिळतात. आज दहा लाख अंध रूग्ण नेत्रदानाच्या प्रतिक्षेत आहेत. १२६ कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात आज वर्षाकाठी फक्त जास्तीत जास्त एक हजार मृतांचे अवयव दान होते. आजही बहुसंख्येने असलेले नेत्र दाते वगळता इतर बाबतीत ही संख्या अगदीच तोकडी आहे.

जगातल्या इतर देशांच्या तुलनेत आणि आपल्या देशातील गरजेच्या मानाने आपण खूपच मागे आहोत. दर दहा लाख नागरिकांच्या मागे आपल्या देशात फक्त ०.०८% जण अवयवदान करतात. स्पेन, सिंगापूर, बेल्जियम अशा देशांमध्ये दर दहा लाखात २०-४० एवढे आहे. अवयव प्रत्यारोपणाचे मूलभूत तीन प्रकार, जिवंत संबंधीत व्यक्ती (आई, वडील, भाऊ, बहीण) जिवंत असंबंधीत व्यक्ती (मित्र, आप्तेष्ट, हितचिंतक) मस्तिष्क मृत (मेंदू-मृत, ब्रेन डेथ) व्यक्तीकडून अवयव रूग्णाला दिला जातो.

जिवंत व्यक्ती आपल्या एका अवयवाचे दान करू शकतो. एक मूत्रपिंडाचे दान करूनही दुसऱ्या निरोगी मूत्रपिंडाच्या आधारे सर्व सामान्य आयुष्य जगता येते. काही वेळा यकृताचा, स्वादुपिंडा ग्रंथीचा काही भाग दान करता येते. रक्त, अस्थित, अस्थिमज्जा, त्वचा याचे दान करता येते. यासाठी दानपत्राची आवश्यकता नसते.


मानवी अवयवयाचे व्यापारीकरण थांबविण्यासाठी व पैशासाठी अवयव विकून गरिबांची होणारी पिळवणूक रोखण्यासाठी तसेच रूग्णाच्या न कळत त्याचे अवयव काढण्यावर निर्बंध आणण्यासाठी सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपणाच्या १९९४ कायद्यानुसार अवयवयांचा व्यापार करण्याची सक्त मनाई आहे. त्या करीता मान्यता प्राप्त रूग्णालयाकडून मानवी अवयवयांचे प्रत्यारोपण करण्यात येते.

आपल्याला मृत्युपश्चात जर नेत्रदान करायचे असेल तर मान्यताप्राप्त नेत्रपेढीमध्ये विहित नमुन्यात अर्ज भरावा लागतो. डोळे तसेच इतर अवयव शरीर दान करण्याकरीता अर्ज भरत नोंदणी करावी लागते. त्यातच डोनर कार्ड जपून ठेवून आपल्या वारसांना त्याची कल्पना देऊन आपली प्रिय व्यक्ती जर अपघाताने किंवा इतर कुठल्याही कारणाने अकाली मृत्यु पावल्यास वेळ न दडवता ते अवयव योग्य रितीने शरीरापासून विलग करून सुरक्षित रित्या जतन केले जातात. या सर्व गोष्टी मान्यता प्राप्त संस्थांमधून करावी. योग्य वेळेत ते अवयव गरजू व्यक्तींच्या प्रत्यारोपणासाठी वापरले जातात.

शरीरातून फुफ्फुस, हृदय, लिव्हर, स्वादुपिंड ग्रंथी, किडनी, लहान आतडे यांचे अवयवदान तर पेशींमध्ये त्वचा कॉर्निया (दृष्टीपटल) हाडे, टेन्शन व लिगामेन्टस (मज्जातंतू), हृदयाच्या झडपा, निला, हृदयाच्या वरील आवरणात यांचे दान करता येते. अवयव शरीरातून काढल्यानंतर ठराविक वेळेत त्यांचे प्रत्यारोपण शरीरातून काढल्यानंतर ४ ते ५ तास, फुफ्फुसे ८ तासात लिव्हर व लहान आतडे १२ तासात, स्वादुपिंड ग्रंथी १८ तासात, तर किडनी २४ तासात प्रत्यारोपण करणे महत्त्वाचे असते.

# डिस्ट्रिक्ट गव्हर्नर आशा वेणुगोपाल यांचा संदेश

रो.आशा वेणुगोपाल



प्रिय रोटेरियन्स,

रोटरी वर्ष २०२३-२४ मध्ये आमच्या डिस्ट्रिक्ट ३०३० ची सेवा करणे माझ्यासाठी खरोखरच एक विशेषाधिकार आहे. तुम्ही माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी आदरणीय आणि नम्र आहे. या गेल्या वर्षी, आमच्या जिल्ह्याने आमच्या सर्व समुदायातील गरजूंसाठी अविश्वसनीय सेवा आणली आहे. ३०३० च्या प्रत्येक रोटेरियनचे मी आभारी आहे, की त्यांनी मला पुन्हा एकदा आमच्या संसाधनांना योग्य कारणासाठी चॅनेल करण्याची संधी दिली. जेव्हा आपण नवीन रोटरी वर्षाची पहाट पाहतो, आणि इमॅजिनपासून ते जगामध्ये आशा निर्माण करण्याचा मार्ग ओलांडत असतो, तेव्हा आपल्या खांद्यावर आपल्या समुदायाप्रती अधिक जबाबदारी असते. आम्ही हे निश्चित केले पाहिजे की आम्ही चार मार्ग चाचणी जगून आणि रोटरी इंटरनॅशनलच्या ऑब्जेक्ट्सशी खरे राहून इतरांना प्रेरित करतो. महामारीमुळे आपल्याला आलेल्या आव्हानांवर आणि अडचणींवर मात करण्यासाठी समाज मोठ्या प्रमाणावर संघर्ष करत आहे. आर्थिक संकट, बेरोजगारी, मानसिक आजार हे काही परिणाम आहेत ज्यांचा आपल्याला सामना करावा लागला आहे. रोटरी इंटरॅनशनलचे अध्यक्ष गॉर्डन मॅकइनली यांनी आम्हाला 'जगात आशा निर्माण करा' ही प्रेरणादायी थीम दिली आहे. शांततेवर अधिक भर देऊन आशा पुनर्संचयित करणे हे आमचे ध्येय असल्याने आपण दिवाबत्ती बनले पाहिजे.

आमच्या जिल्ह्याची यावर्षाची थीम आहे 'आशरिका - आशेचा किरण'. आपल्या पूर्वसुरींनी सुरूकेलेले चांगले काम आपण चालू ठेवले पाहिजे. विविधता, समानता आणि समावेश आणि मानसिक आरोग्यासोबतच, रोटरी इंटरनॅशनलचे सात क्षेत्र फोकस हे आमचे प्राधान्य असले पाहिजे. येत्या वर्षात आपण एकत्र काम करूया आणि आपल्या समाजाच्या भल्यासाठी बदल घडवून आणण्यासाठी आणि आशेची किरण बनून बरेच काही करूया. डिरेक्टरी टीमने 'आशाभिलेख' म्हणजेच 'आशाभिलेख' तयार करण्यासाठी खूप वेळ आणि मेहनत घेतली आहे. महत्त्वाचे दस्तऐवज, आणि मी कृतज्ञ आहे आणि टीमने आम्हाला ऑफर केल्याबद्दल त्यांच्या समर्पणाबद्दल आभारी आहेत फरक असलेली निर्देशिका. एक अर्थपूर्ण वर्ष जावो आणि आपण जे करतो त्याचा आनंद घेऊया. चला जगात आशा निर्माण करूया.

---

# पदग्रहण समारंभ

सोमवार दिनांक १० जुलै २०२३ रोजी रोटरी क्लब जळगावचा पदग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचे व उपस्थित सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर रो.पी.पी.मोहन कुलकर्णी यांच्या बासरी वादन सादर करून गणेश वंदना करण्यात आली. आय.पी.पी.राजेश वेद यांनी त्यांच्या मागील वर्षाच्या कार्यकाळाचा आढावा सादर केला. त्यानंतर पिन आणि कॉलर एक्सचेंज प्रोग्रॅम करण्यात आला. यावेळीअध्यक्ष पदाची रो. मनोज जोशी तर मानद सचिव म्हणून रो.ॲड. हेमंत भंगाळे यांनी सूत्रे स्वीकारली. नूतन अध्यक्ष मनोज जोशी यांनी त्यांचे नवीन वर्षाबाबतचे मनोगत व्यक्त करून, अजिंठा बुलीटीनचे पब्लिकेशन करण्यात आले. तसेच नवीन मेंबर श्री.तेजस पवार यांचे इंडक्शन करण्यात आले. अध्यक्षांनी त्यांचे नवीन कार्यकारणी सदस्य जाहीर केले. त्यानंतर सहप्रांतपाल नितीन इंगळे यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर आशा वेणुगोपाळ यांनी आपल्या क्लबला पाठवलेला संदेश वाचून दाखवला. रोटरी हॉलमध्ये झालेल्या पदग्रहण सोहळ्यास माजी प्रांतपाल रो. मोहन पालेशा व सहप्रांतपाल रोटेरियन नितीन इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रांतपाल रो मोहन पालेशा यांनी 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' या विषयावर अतिशय सुरेख भाषण केले. परिचय डॉक्टर तुषार फिरके यांनी केला तर आभार ॲड.सागर चित्रे यांनी मांडले.





## जीवेत् शरदः शतम्...!

| | |
|---|---|
| १) ५ ऑगस्ट | पीपी रो.सुरेंद्र लुंकड |
| २) ८ ऑगस्ट | रो. जवर्धन दुर्गादास नेवे |
| ३) १० ऑगस्ट | रो. प्रेमशंकर अग्रवाल |
| ४) १४ ऑगस्ट | रो. ॲड. श्रीकांत भुसारी |
| ५) १५ ऑगस्ट | रो. दिपिका चांदोरकर |
| ६) १५ ऑगस्ट | रो. रोबिन विजयकुमार लुल्ला |
| ७) १७ ऑगस्ट | रो. ॲड. हेमंत भंगाळे |
| ८) १७ ऑगस्ट | रो. नंदकिशोर जाखेटीया |
| ९) १९ ऑगस्ट | रो. प्रणेश (पारस) सुरेंद्र जैन |
| १०) २० ऑगस्ट | रो. किशोर तलरेजा |
| ११) २१ ऑगस्ट | रो. प्रदीप साठे |
| १२) २५ ऑगस्ट | रो. मकरंद डबीर |
| १३) ३१ ऑगस्ट | रो. रणवीरसिंग कलसी |

## नांदा सौख्यभरे...

१) २५ ऑगस्ट रो. डॉ. ज्ञानेश पाटील

## अभिनंदन!

* रो.विजय जोशी यांचे सुपुत्र जयेश याने ८.५ सी.जी.पी.ए. मिळवून बी.टेक.(मेकॅनिकल) ही पदवी संपादन केले.

* रो.आसिफ मेनन यांचे चिरंजीव अनस विंची याने ८.२४ सी.जी.पी.ए. मिळवून बी.टेक. ही पदवी संपादन केले.

* हिंदी साहित्य गंगा संस्थाध्यक्षपदी रो.उदय पोद्दार यांची एकमताने नेमणूक करण्यात आली.

* पी.पी.रो.संदीप शर्मा यांनी पाचमरती मान्सून मॅरेथॉन २१ कि.मी. टप्पा यशस्वीपणे पार पाडला.

